# पंचतंत्र व हितोपदेशातील नीतिकथांमध्ये येणारी सुभाषिते व नैतिक मूल्ये संबंध

भारती रामचंद्र केकाणे
मार्गदर्शकः मंडलिक अनिरूध्द

**शोधसार :**

आजच्या या युगात नैतिक मूल्ये ही फार गरजेची वाटू लागली आहेत. एकूण विचार करता नैतिक मूल्ये जोपासणे म्हणजे चांगल्या रीतीने जगणे व दुसऱ्यांनाही चांगल्या रीतीने जगू देणे असे म्हणता येईल. आज प्रत्येक क्षेत्रात नैतिक मूल्यांची घसरण होत असलेली दिसून येत आहे. त्यामुळे भ्रष्टाचार, आत्महत्या, चोरी करणे, फसवणे, एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हत्या, मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार, मोबाईल चा अति व गैरवापर व त्यामुळे घडणाऱ्या घटना अशा अनेक घटना समाजात घडताना दिसत आहेत व हे टाळण्यासाठी समाजात नैतिकतेची बीजे रूजवणे आवश्यक झाले आहे. व ही नैतिकतेची बीजे रुजवण्याचे महान कार्य नीतिकथांमध्ये आलेली सुभाषिते चांगल्या प्रकारे करु शकतात.

पंचतंत्र, हितोपदेश या नीतिकथांच्या ग्रंथांमध्ये अनेक सुभाषिते आलेली आहेत. ज्याद्वारे शालेय जीवनातच मुलांवर योग्य संस्कार करणे सहज शक्य आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये नीतिकथांमध्ये आलेली सुभाषिते व नैतिक मूल्ये यांचा संबंध स्पष्ट केलेला आहे.

**विशेष शब्द** : मूल्यशिक्षण, नैतिक मूल्य, सुभाषिते, नीतिकथा, संवेदनशीलता, सौजन्यशीलता, श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रीय एकात्मता.

भारतीय संस्कृत कथासाहित्याची जी वर्गवारी केली जाते. तिच्यात नीतिकथा हा एक प्रमुख भाग आहे. नीतिकथा हे उपदेश करण्याच्या हेतूने निर्माण झालेले साहित्य आहे. नीतिकथा ही एखादे नीतितत्त्व मनाशी धरून रचलेली कथा असते. योग्य त्या नीतितत्त्वाचा कथेच्या आधारे उपदेश केला असता त्याचा परिणाम खोल व चिरकालिक होतो हे समजून आल्यामुळे नीतिवृद्धांनी कथेचा आधार घेतला म्हणूनच हितोपदेशात म्हटले आहे की,

**'कथाच्छलेन बालानां नीतिस्तदिह कथ्यते'। (हि.प्र.श्लो.8)**

**नीतिकथांची वैशिष्ट्ये**

संस्कृत साहित्यातील कथासाहित्य हे वेळोवेळी आदर्शवत असे संस्कार व उपदेश देण्याच्या कामी उपयोगी पडत आलेले आहेत. त्यातल्या त्यात नीतिकथा ह्या नीतिमूल्यांची जोपासना करण्याच्या हेतूने विशेष महत्त्वाच्या आहेत.

1) नीतिकथा ह्या बालोपयोगी आहेत. या कथांच्या आधारे नैतिक मूल्ये शिकविली
जातात.
2) यात पात्र म्हणून केवळ मानवांच्या समावेश नसून पशू, पक्षी, किटक इ. मानवेतर पात्रांचाही समावेश असतो.
3) नीतिकथा ह्या विशेषतः नीतिशास्त्र, अर्थशास्त्र व धर्मशास्त्राशी संबंधीत आहेत.
4) यात दैनंदिन व्यवहारातील योग्य व अयोग्य दोन्ही गोष्टींचा उल्लेख आढळतो उदा पावित्र्य, कर्तव्यपालन मैत्री वचन इ.बरोबरच छल, कपट, खोटेपणा, अविश्वास, दांभिकता, स्त्रियांचे दुश्चरित्र इ. दोषांवर ही प्रकाश टाकला आहे.
5) नीतिकथांमधील पात्र पशू,पक्षी इ. हे मानवांप्रमाणेच मानवीय गुण व स्वभावाने युक्त आहेत.
6) नीतिकथांमध्ये जीवनात यशस्वी होण्याच्या उद्देशाने उपयुक्त असणाऱ्या सर्व गुणांचा उल्लेख केलेला आहे. तसेच जीवनात अपयशास कारणीभूत असणाऱ्या गोष्टींवर ही प्रकाश टाकला आहे.
7) नीतिकथांमध्ये कथा, नीति, सदाचार, व्यवहारज्ञान, धर्म उपदेश तसेच काव्य.सौंदर्य यांची योग्य गुंफन केलेली आढळते.

**सुभाषितांचे महत्त्व :**

श्लोकमय सुभाषिते ही संस्कृत साहित्यातील एक अमूल्य व समृद्ध भांडारच आहेत. ही सुभाषिते जीवनाच्या सर्व अंगोपागांना स्पर्श करणारी आहेत. चार पुरुषार्थ, नवरस, षड्रिपू इ. सारख्या विषयांचा सुभाषितांमध्ये समावेश होतो. तसेच त्यात उपहास, उपदेश आणि विनोदही वेगवेगळया विषयांच्या अनुषंगाने आढळतात. अशा सुभाषितांच्या माध्यमातून नीतिकथांमधून योग्य नैतिक मूल्ये जोपासली जावू शकतात. पंचतत्र, हितोपदेश हे नीतिबोधक असल्यामुळे त्यामधून तर अनेक सुभाषिते आढळतात. पंचतंत्रामध्ये तर सुभाषिते ही वाक्चातुर्यासाठी तसेच विद्वत्तेसाठी किती महत्त्वाची आहेत हे सांगितले आहे.

**सुभाषितमयद्रव्यसंग्रहं न करोति यः।**
**स तु प्रस्तावयज्ञेषु कां प्रदास्याति दक्षिणाम् ।।(पं.2.179 )**
**अर्थात–** जो सुभाषितरूपी द्रव्याचा संग्रह करीत नाही तो संवादयज्ञात कोणती दक्षिणा देईल? म्हणजेच सभेत श्रोत्यांना कसे संतुष्ट करू शकेल?

**सुभाषितांमध्ये आलेली नैतिकमूल्ये :**

नैतिकमूल्यांमध्ये वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, श्रमप्रतिष्ठा, सौजन्यशीलता, सर्वधर्मसहिष्णुता, राष्ट्रभक्ती, संवेदनशीलता, वैज्ञानिक, दृष्टीकोन, राष्ट्रीय एकात्मता, स्त्रीपुरुष समानता या दहा मुख्य नैतिक मूल्यांचा समावेश होतो. या नैतिक मूल्यांच्या आधारे मुलांमध्ये ज्ञानाबरोबरच शील, चारित्र्य, संस्कार यांची रुजवणूक करणे म्हणजेच मूल्यशिक्षण होय. या मूल्यशिक्षणातूनच मुलांमध्ये न्याय, स्वातंत्र्य, आदर, सत्य, अहिंसा, जबाबदारी, सचोटी, निष्ठा, प्रामाणिकपणा इ. मूल्यांची जोपासना होऊ शकते व ही सर्व नैतिक मूल्ये नीतिकथांमधील सुभाषितांमध्ये आढळून आलेली आहेत.

**संवेदनशीलताः**

बाह्य जगात घडणाऱ्या घटनांचा, प्रसंगाचा, सभोवतालच्या परिसराचा, परिस्थितीचा व सहवासात येणाऱ्या व्यक्तिच्या वागण्या. बोलण्याचा व्यक्तिच्या मनावर परिणाम होऊन घडणारी प्रतिसादात्मक कृती म्हणजेच संवेदनशीलता होय[1].

संवेदनशीलता व्यक्तिच्या संगतीवर, मित्र परिवारावर तसेच त्याच्या वागण्या बोलण्यावर, राहणीमानावर अवलंबून असते. म्हणून यांत संगत, मैत्री , सत्य, अहिंसा, धैर्य इत्यादी मुल्ये अंतर्भूत होतात. या मुल्यांच्या अनुषंगाने बरीच सुभाषिते नीतिकथांमध्ये आलेली आहेत.

व्यक्तिची जडणघडण ही बहुदा संगतीवरच आधारित असते, त्यामुळे कोणाशी संगत करावी? वाईट संगतीचे दुष्परिणाम काय होतात? यावर विविध सुभाषिते नीतिकथांमध्ये आलेली आहेत.

**असतां संगदोषेण साधवो यान्ति विक्रियाम्।**
**दुर्योधनप्रसङ्गेण भीष्मो गोहरणे गतः ।। (पं.1.274)**

---

[1] मूल्यशिक्षण प्र. 2 रे पृ. 26 नदपीपअंरपणंबण्पद.चकी

**अर्थः** दुर्जनांच्या संगतीदोषाने सज्जन ही विकारवश होतात. जसे की, दुर्योधनाच्या संगतिमुळे भीष्म गोहरणास गेले होते.

पंचतंत्रातील मित्रभेद या तंत्रामध्ये भीष्मासारख्या सज्जनाला दुर्योधनासारख्या दुर्जनाच्या संगतीमुळे दोष उत्पन्न झाला. यावरुन दुर्जनाच्या संगतीदोषाने सज्जनही विकारवश होतात. म्हणून नेहमी चांगल्या व्यक्तिच्याच सहवासात राहावे असे सांगितले आहे. तसेच पंचतंत्रातील मित्रसंप्राप्ती या तंत्रात तर बृहस्पति म्हणतात की, ज्याचा पराक्रम, कुळ व कृती माहित नाही अशा बरोबर कधीच संगत करू नये.[2] चांगल्या व्यक्तिंच्या संसर्गामुळे होणारे फायदे सांगताना पंचतंत्रातील काकोलूकीय या तंत्रामध्ये पुढील श्लोकात म्हटले आहे की,

**महाजनस्य सम्पर्कः कस्य नोन्नतिकारकः ।**
**पद्मपत्रस्थितं तोयं धत्ते मुक्ताफलश्रियम् ।। (पं.3.59 )**

**अर्थ** : महात्म्याचा संपर्क कोणास उन्नतिकारक होत नाही ?
कमलपत्रावरील पाणी मोत्यासारखी कांती (तेज, सौंदर्य ) धारण करते.

म्हणजेच कमलपत्राच्या सान्निध्यात ज्याप्रमाणे पाण्याचा थेंब मोत्यासारखे सौंदर्य प्राप्त करतो त्याप्रमाणे महात्म्याच्या संपर्कात व्यक्तिच्या जीवनाचे कल्याण होते तसेच हितोपदेशातील प्रस्ताविकामध्ये ही सज्जनाच्या संगतीचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

**काचः काञ्चनसंसर्गाद्धत्ते मारकतीं द्युतिम् ।**
**तथा सत्संनिधानेन मुर्खो याति प्रवीणताम् ।।(हि.प्र..41)**

**अर्थ** : जसे बिलोरी काच सोन्याच्या सान्निध्यात ठेवल्याने मरकत मण्यांची कांती धारण करते, त्याप्रमाणे सज्जनांच्या साहचर्याने मूर्ख मनुष्य ही निपुणता प्राप्त करू शकतो.

अशा प्रकारे ही व अशी अनेक सुभाषिते सत्संगती विषयी आलेली आढळतात.तसेच संगत करण्यापूर्वी मित्र कसा असावा? खरा मित्र कसा ओळखावा? मैत्री करताना योग्य मित्राची निवड कशी करावी? यावर ही सुभाषिते आलेली आढळतात.

पंचतंत्रातील मित्रभेद या तंत्रात खरा मित्र कसा ओळखावा? हे सांगताना म्हटले आहे की,

---

[2] पं.मि.सं.2.63

**स सु×दव्यसने यः स्यादन्यजात्युद्भवोऽपि सन् ।**
**वृद्धौ सर्वोऽपि मित्रं स्यात्सर्वेषामेव देहिनाम् ।।(पं.1.367)**

**अर्थ**: अन्य जातीत जन्म झालेला असला तरी जो दुखाःत साथ देतो, तोच मित्र असतो, समृद्धीत सर्वच देहधारींचा प्रत्येकजण मित्र असतो. म्हणजेच सुखात सर्वच मित्र असतात पण जो दुःखात साथ देतो तोच खरा मित्र असतो.

पंचतंत्रातील लब्धप्रणाश या तंत्रात आपल्या फायद्यासाठी जवळ येणाऱ्या स्वार्थी मित्राचा त्याग करावा असे म्हटले आहे.

**वर्जयेत्कौलिकाकारं मित्र प्राज्ञतरो नरः।**
**आत्मनः सम्मुखं नित्यं य आकर्षति लोलुपः।।(पं.4.12)**

**अर्थ** : अत्यंत बुद्धिमान मनुष्याने जो लोभामुळे आपल्याकडे येतो अशा ढोंगी मित्राचा त्याग करावा.

अशाप्रकारे योग्य मित्राची पारख कशी करावी? हे सांगणारी सुभाषिते तर आहेतच तसेच व्यक्तिच्या हातून अनेक पापे ही क्रोधामुळेच घडत असतात, क्रोधावर नियंत्रण असणे फार गरजेचे आहे. कारण त्यामुळे आपलेच फार मोठे नुकसान होत असते. पंचतंत्रातील मित्रभेदात म्हटले आहे की,

**पुंसामसमर्थानामुपद्रवायात्मनो भवेत्कोपः ।**
**पिठरं ज्वलदतिमात्रं निजपार्श्वनेव दहतितराम्।।(पं.1.353)**

**अर्थ**: असमर्थ पुरुषांचा क्रोध स्वतःच्याच नुकसानास कारणीभूत होतो जसे अत्यंत तापलेली कढई आपल्या आजूबाजूलाच अधिक तापवते. म्हणजेच क्रोधामुळे व्यक्तिचे स्वतःचेच नुकसान होत असते.

ज्याप्रमाणे क्रोधावर नियंत्रण आवश्यक असते त्याचप्रमाणे माणसाने नेहमी खरे बोलले पाहिजे. तैत्तिरीय उपनिषदातही सत्याचे महत्त्व सांगताना 'सत्यंवद, धर्मंचर ' असे म्हटले आहे.[3] खोटे बोलल्याने सहस्त्र हत्येचे पाप लागते. तसेच सत्याचे पारडे नेहमीच जड असते. उशिरा का होईना, पण शेवटी सत्याचाच विजय होत असतो.

हे सांगताना पंचतंत्रातील काकोलूकीय या तंत्रात म्हटले आहे की,

[3] तैत्तिरियोपनिषद अनुशासन (3.5.2)

**पञ्च पश्वनृते हन्ति दश हन्ति गवानृते।**
**शतं कन्यानृते हन्ति सहस्रं पुरुषानृते ।।(पं.3.109)**

**अर्थः** पशुविषयक असत्य बोलल्याने पाचांच्या हत्येचे, गायींविषयी असत्य बोलल्याने दहांच्या हत्येचे, कन्येविषयी असत्य बोलल्याने शंभराच्या हत्येचे व मनुष्याविषयी असत्य बोलल्याने सहस्र हत्यांचे पाप लागते. सत्याचे महत्त्व सांगताना हितोपदेशात तर म्हटले आहे की,

**अश्वमेधसहस्राणि सत्यं च तुलया कृतम्।**
**अश्वमेधसहस्राद्धि सत्यमेवाति रिच्यते ।। (हि.4.130)**

**अर्थ** : सहस्र अश्वमेध आणि सत्य यांची तुलना केली तर सहस्र अश्वमेधांपेक्षाही सत्याचे पारडे जड असल्याचे दिसून येईल.

सत्याइतकेच महत्त्वाचे मूल्य म्हणजे अहिंसा. अहिंसेचे महत्त्व सांगताना, महाभारतात श्रीकृष्णांनी 'अहिंसा परमोधर्मः' असे म्हटले आहे. हितोपदेशात व पंचतंत्रात पुढील सुभाषितामधून अहिंसेचे महत्त्व सांगितले आहे.

**सर्वहिंसानिवृत्ता ये नराः सर्वसहाश्च ये।**
**सर्वस्याश्रयभुताश्च ते नराः स्वर्गगामिनः ।। (हिं.1.64)**

**अर्थ** : जे लोक सर्वप्रकारच्या हिंसेपासून पराङ्मुख असतात सर्व प्रकारची परिस्थिती सहन करण्यास समर्थ असतात आणि सर्वांना आश्रय देणारे असतात ते लोक स्वर्गगामी असतात.

**हिंसकान्यपि भूतानि यो हिंसति स निर्घृणः।**
**स याति नरकं घोरं किं पुनर्यः शुभानिच।। (पं.3.106)**

**अर्थ** : हिंसक प्राण्यांची ही जो हत्या करतो तो निर्दयी असतो, तो घोर नरकात जातो, तर जो अहिंसक जीवाना मारतो , त्यांचे काय सांगावे?

हिंसा करू नये, हिंसक प्राण्यांची हत्या करणारा घोर नरकात जातो अशा प्रकारे अहिंसेचे महत्त्व विशद केल्यानंतर नीतिकथांमधील सुभाषितांमध्ये माणसाने धैर्यवान असावे, धैर्य कधीच सोडू नये हे ही सांगितले आहे. कारण धैर्याच्या अभावाने नकारात्मक विचारांची निर्मिती होवू लागते व त्यातूनच पुढे मनाचे खच्चीकरण होऊन आत्महत्येसारखी प्रवृत्ती निर्माण होते. म्हणून धैर्याचा त्याग करू नये, हे सांगतांना पंचतंत्रातील मित्रभेद या तंत्रातील पुढील श्लोकात म्हटले आहे की,

**त्याज्यं न धैर्यं विधुरेऽपि दैवे, धैर्यात्कदाचित्स्थितिमाप्नुयात्सः।**
**याते समुद्रेऽपि हि पोतभङ्गे सांयात्रिको वाञ्छति कर्म एव।।(पं.1. 216)**

**अर्थ** : दैवाची साथ नसली तरी मनुष्याने धैर्याचा त्याग करु नये. कारण धैर्याने कदाचित स्वाभाविक स्थिती प्राप्त होईल. समुद्रात जहाज बुडाल्यावरही सागरी व्यापारी उदयोग करण्याचीच इच्छा करतो.

ज्याप्रमाणे जहाज बुडाल्यावरही सागरी व्यापारी व्यापार करण्याची इच्छा सोडत नाही. त्याप्रमाणे दैवाची साथ असो वा नसो व्यक्तिने धैर्य सोडता कामा नये.पंचतंत्रातील लब्धप्रणाश या तंत्रात तर म्हटले आहे की, सिंह ज्याप्रमाणे भुकेलेला असला तरीही गवत खात नाही,[4] त्याप्रमाणे व्यक्तिने संकटात सापडले तरी नीतिमार्गाचे उल्लंघन करू नये.

अशाप्रकारे संवेदनशीलता या नैतिक मूल्यांवर आधारित अनेक सुभाषिते नीतिकथांमध्ये आढळतात.

**सौजन्यशीलता** :

आपल्या आचारविचारातून बोलण्यातून इतरांबद्दल आदरभाव, सद्भाव व्यक्त करणे आणि कुणालाही न दुखवता व्यवहार करणे म्हणजेच सौजन्यशीलता.[5] या नैतिक मूल्यांचा अंतर्भाव असणारी बरीच सुभाषिते नीतिकथांमध्ये आढळतात.

दुसऱ्यास त्रास देणाऱ्यास जन्मोजन्मी दुःख भोगावे लागते. वाईट कर्माचे फळ नेहमी त्रासदायकच असते. वाईट कर्मामुळे व्यक्तिची कीर्ती नाहीशी होते, मान सन्मान नाहीसा होतो. त्यामुळे कधीही दुसऱ्यास दुःख होईल असे वागू नये हे सांगताना पंचतंत्रातील मित्रभेद या तंत्रात म्हटले आहे की,

**अविरुद्ध सुखस्थं यो दुःखर्मागे नियोजयेत ।**
**जन्मजन्मान्तरे दुःखी स नरः स्यादसंशयम्।। (पं.1.393 )**

**अर्थ** : जो मनुष्य अविरोधी व सुखात राहणाऱ्यांना दुःख मार्गास लावतो तो मनुष्य जन्मोजन्मी दुःखी होतो ह्यात संशय नाही.

---

4 पं. ल. (44.76)

5 मूल्यशिक्षण प्र. 2 रे पृ. 27 नदपीपअंरपणंबण्पद.चकि

पंचतंत्रातील मित्रसंप्राप्ती या तंत्रात ज्या गोष्टीमुळे अप्रतिष्ठा प्राप्त होईल, अधोगती होईल असे कर्म कधीही करू नये असे म्हटले आहे.[6] तर अपरीक्षितकारक या तंत्रात तर कलहाने घरे नाहिशी होतात. वाईट बोलण्याने मैत्री नष्ट होते. वाईट राजामुळे राष्ट्र नाहीशी होतात. तसेच वाईट कर्मामुळे माणसाची कीर्ती नाहिशी होते.[7] हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**राष्ट्रीय एकात्मता :**

धर्म, वंश, भाषा, चालीरीती, आहार.विहार, कला, संस्कृती, सण, उत्सव, भौगोलिक परिस्थिती यातील वेगळेपणा असूनही एकता असणे म्हणजेच एकात्मता होय.[8]

अशक्यातील अशक्य गोष्टीही एकीच्या बळावर पूर्ण होत असते म्हणूनच म्हणतात की, 'एकीचे बळ मिळते फळ' एकीत खूप ताकद असते. अशाप्रकारे एकीचे महत्त्व विशद करुन सुभाषिते राष्ट्रीयएकात्मता वाढीस लावण्याचे महत्त्वाचे काम करतात. पंचतंत्रातील मित्रभेद या तंत्रात एकीचे महत्त्व सांगताना म्हटले आहे की,

**बहुनामप्यसाराणां समवायो हि दुर्जयः ।**
**तृणैरावेष्ट्यते रज्जुर्यया नागोपि बध्यते ।। (पं.1.361)**

**अर्थ** : ज्याप्रमाणे तृणांच्या बनविलेल्या दोरीने हत्ती ही बांधला जातो त्याप्रमाणे पुष्कळ दुर्बलांचा समूह सुद्धा दुर्जय असतो.

तर काकोलूकीय या तंत्रात कितीही जोराचा वारा आला तरीही एकजुटीने उभ्या असणाऱ्यावृक्षांना हलवू शकत नाही. त्याप्रमाणे एकजुटीने एकोप्याने राहणाऱ्यांवर कधीही कोणतेही संकट येवू शकत नाही असे सांगितले आहे.[9] तसेच हितोपदेशातील मित्रलाभ या तंत्रात म्हटले आहे की, ज्याला बांधव सोडून जातात, जो एकटा राहतो अशा व्यक्तिची अवस्था तूस काढून टाकलेल्या तांदळाप्रमाणे होते.म्हणून आपले बांधव थोडेसेच असले तरी त्यांच्याशी एकोप्याने राहण्यातच आपला फायदा असतो. हाच श्लोक

---

6 पं.मि.सं. (2.117)

7 पं. अ. (5.77)

8 मूल्यशिक्षण प्र. 2 रे पृ. 28 नदपीपअंरपणंबण्पद.चकि

9 पं.का.(3.53)

पंचतंत्रातील काकोलूकीय या तंत्रातही आलेला आहे.[10] व दोन्हींचा उद्देश एकच आहे तो म्हणजे माणसाने एकोप्याने राहिले पाहिजे.

'हे विश्वची माझे घर' या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वच आपले कुटुंब मानावे असा संदेश हितोपदेशातील मित्रलाभ व पंचतंत्रातील अपरीक्षितकारक या तंत्रामधील

सुभाषितातून दिला गेला आहे.[11] या व अशा अनेक सुभाषितांमधून राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागू शकते.

**श्रमप्रतिष्ठा :**

कष्टाचे कोणतेही काम कमी दर्जाचे नसते. असंख्य हात सतत कष्ट करतात म्हणून आपले आयुष्य सुलभ बनते प्रत्येकाने स्वतःहून व मनापासून काम केले पाहिजे म्हणजेच श्रमप्रतिष्ठा होय.[12]

'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता, तेलही गळे'। या उक्तीप्रमाणे कोणतीही गोष्ट प्रयत्नाशिवाय साध्य होऊ शकत नाही. म्हणून माणसाने प्रयत्न करणे सोडू नये. प्रयत्नांसाठी आवश्यक असते ते परिश्रम. केवळ भाग्यावर अवलंबून न राहता माणसाने कष्ट केले पाहिजेत. हे सांगताना हितोपदेशातील प्रस्ताविकात व पंचतंत्रातील मित्रभेद या तंत्रात म्हटले आहे की, उद्योग करणाऱ्यापुरुषश्रेष्ठास लक्ष्मी प्राप्त होते. दैव देईल असे सामर्थ्यहीन भित्रे म्हणत असतात. दैवावर मात करून आपल्या सामर्थ्यानुसार परिश्रम व प्रयत्न केले पाहिजेत.[13] तर पंचतंत्रातील मित्रसंप्राप्ती या तंत्रात म्हटले आहे की,

**उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ।**
**न हि सिंहस्य सुप्तस्य प्रविशन्ति मुखे मृगाः ।।(पं.2.141)**

**अर्थ** : परिश्रमानेच कार्ये सिद्धीस जातात केवळ मनात विचार करून नव्हे. जसे झोपलेल्या सिंहाच्या मुखात मृग स्वतःहून प्रवेश करीत नाही. त्यासाठी त्यालाच प्रयत्न करावे लागतात.अशाप्रकारे वरील सुभाषितांमधून श्रमाचे महत्त्व विशद केलेले आढळून येते.

---

10 पं. का.(3.56)
11 हि.मि.(1.70),पं. अ.(5.38)
12 मूल्यशिक्षण प्र. 2 रे पृ. 28 नदपीपअंरपण्बण्पद.चकी
13 हि.प्र.(0.31),पं.मि.(1.392)

ही व अशी इतर ही नैतिक मूल्ये नीतिकथांमधील सुभाषितांमध्ये आढळून येतात. जी मूल्यशिक्षणाचे महत्त्वाचे कार्य करु शकतात.

**निष्कर्ष:**

संस्कृत साहित्यातील नीतिकथा या अबालवृद्धांना नेहमीच आकर्षित करीत आलेल्या आहेत. नीतिकथा या मुळातच नीतिशिकविण्यासाठीच उत्पन्न झालेल्या आहेत. पण संस्कृत साहित्यातील नीतिकथांमध्ये आलेली सुभाषिते ही त्याहुन किती तरी जास्त प्रमाणात नैतिक मूल्ये शिकवून जातात पंचतंत्र, हितोपदेशात आलेल्या केवळ सुभाषितांमधूनच विदयार्थ्यांना मूल्यशिक्षणाचे धडे दिले जाऊ शकतात. ह्याशोधनिबंधातून हेच सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे की, सुभाषिते शालेय विदयार्थ्यांना मूल्यशिक्षण देण्यासाठी फार उपयुक्त आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

1द्धडॉ. आहुजा सुदेश, 2015, सुभाषितावली.
2द्धप्रा. डॉ खैरनार दिलीप, 2015, भारतीय समाजातील नैतिक मूल्ये.
3द्धश्री ताम्हणकर वि.बा.,2014, हितोपदेश.
4द्धश्री ताम्हणकर वि. बा., 2015, संपूर्ण पंचतंत्र.

**अर्थ** : परिश्रमानेच कार्ये सिद्धीस जातात केवळ मनात विचार करून नव्हे. जसे झोपलेल्या सिंहाच्या मुखात मृग स्वतःहून प्रवेश करीत नाही. त्यासाठी त्यालाच प्रयत्न करावे लागतात. अशाप्रकारे वरील सुभाषितांमधून श्रमाचे महत्त्व विशद केलेले आढळून येते.

ही व अशी इतर ही नैतिक मूल्ये नीतिकथांमधील सुभाषितांमध्ये आढळून येतात. जी मूल्यशिक्षणाचे महत्त्वाचे कार्य करु शकतात.

**निष्कर्ष:**

संस्कृत साहित्यातील नीतिकथा या अबालवृद्धांना नेहमीच आकर्षित करीत आलेल्या आहेत. नीतिकथा या मुळातच नीतिशिकविण्यासाठीच उत्पन्न झालेल्या आहेत. पण संस्कृत साहित्यातील नीतिकथांमध्ये आलेली सुभाषिते ही त्याहुन किती तरी जास्त प्रमाणात नैतिक मूल्ये शिकवून जातात पंचतंत्र, हितोपदेशात आलेल्या केवळ सुभाषितांमधूनच विदयार्थ्यांना मूल्यशिक्षणाचे धडे दिले जाऊ शकतात. •ह्याशोध. निबंधातून हेच

सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे की, सुभाषिते शालेय विदयार्थ्यांना मूल्यशिक्षण देण्यासाठी फार उपयुक्त आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

1द्धडॉ. आहुजा सुदेश, 2015, सुभाषितावली.
2द्धप्रा. डॉ खैरनार दिलीप, 2015, भारतीय समाजातील नैतिक मूल्ये.
3द्धश्री ताम्हणकर वि.बा.,2014, हितोपदेश.
4द्धश्री ताम्हणकर वि. बा., 2015, संपूर्ण पंचतंत्र.